**नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका नांदेड**

**शनिवार**, दि. 17.02.2018 रोजी सकाळी 11.00 वाजता नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेंची सर्वसाधारण सभा महानगरपालिकेच्या शंकररावजी चव्हाण सभागृहात भरविण्यात आली होती .

उपस्थिती नोंदणी रजिस्टर मध्ये स्वाक्षरी करुन सदर सभेस खालील स.सदस्य उपस्थित होते.

**मा. सौ. भवरे शिलाबाई किशोर, महापौर**

**सर्वश्री श्रीमती/**

पाटील विनय विश्वांबर
कल्याणकर ज्योती किशन
देशमुख सतीश पुंडलीकराव
गाडीवाले संदिपसिंघ शंकरसिंघ
बिरकले सरिता बालाजीराव
चव्हाण आनंद शंकरराव
नेरलकर अपर्णा ऋषीकेश
रायबोले ज्योती सुभाष
सोनाळे दुष्यंत गणेशराज
पवळे पुजा बालाजी
गाडीवाले मनमितकौर नरेंद्रसिंघ
शहाणे अल्का जगदीश
सय्यद शेर अली अ. महेबुब अली
अब्दुल सत्तार अ. गफुर
अरशीया कौसर मोहम्मद हबीब
सोनकांबळे गंगाबाई मल्हारी
मोहम्मद साबेर चाउस मोहम्मद नासेर चाउस
शबाना बेगम मो. नासेर
कापुरे गितांजली रामदास
आयेशा बेगम शे. असलम
रावत दिपकसिंग काशिनाथसिंग
खालसा प्रकाशकौर सुरजितसिंघ
तेहरा अमीतसिंग गोपालसिंग
नवाब गुरमितसिंघ ब-यामसिंघ
गोडबोले ज्योत्सना राजु
गायकवाड चित्रा सिध्दार्थ
गोरे शांता संभाजी
गुपिले बेबी जनार्धन
देशमुख मंगला गजानन
राऊत दिपक नरहरी
तुप्पेकर संगीता सखाराम
पवळे उमेश देवराव
वाघमारे दयानंद नामदेव
स्वामी शैलजा किशोर
पिंपळे महेंद्र हिरामन
देशमुख वैशाली मिलींद
चव्हाण उमेशसिंघ अशोकसिंघ
गड्डम नागनाथ दत्तात्रय
स्वामी किशोर मल्लीकार्जून
गजभारे बापुराव नागोराव
गाडीवाले विरेंद्रसिंघ जगतसिंघ
रझीया बेगम बाबु खान
शमीम बेगम शेख जावीद
अ. रशिद अ. गणी
अब्दुल शमीम अब्दुल्ला साब
अ. लतीफ अ. मजीद
फरहत सुलताना खुर्शीद अन्वर
अ. हफीज अ. करीम
फारुख हुसेन कासीम पिरान
सोडी गुरुप्रितकौर दिलीपसिंघ
रावत भानुसिंग गयादिनसिंग
यादव प्रभा ईश्वरलाल
हुसेन शोएब मजहर
अ. फयीम अ. मुनीर
मोरे दिपाली संतोष
काळे राजु गोविंदराव
जाधव श्रीनिवास नारायणराव

सभेच्या अध्यक्षस्थानी मा. सौ. भवरे शिलाबाई किशोर, महापौर हे होते तसेच मा. श्री गणेश देशमुख आयुक्त, उपस्थित होते.

**महापौर** सुरवातीस नेहमी प्रमाणे वंदे मातरम हे सामुहिक गित म्हणण्यात येते.
वंदे मातरम हे सामुहिक गित म्हणण्यात आले.

**महापौर** उपस्थित सर्व स. सदस्य, आयुक्त, यांचे स्वागत करुन आजच्या सभेच्या कामाकाजास सुरुवात करण्यात येते.

**सभागृहनेता** महाराष्ट्रात दोन घटना घडल्या आहेत. अहमदनगर महानगरपालिकेचे उपमहापौर श्री श्रीपाद छीदंम यांनी महाराष्ट्राचे दैवत, महाराष्ट्राचे कुलभुषण छत्रपती शिवाजी महाराज यांच्या बाबत अपशब्द उदगारले आहे. या घटनेचा मी संपुर्ण सभाग्रहाचे वतीने जाहीर निषेध करतो. तसेच नांदेड येथे दुसरी एक काल घटना घडली ती म्हणजे महापालिकेचे इंजि. संदीप पाटील यांना श्रीमती गुरप्रितकौर सोडी यांचे पती श्री दिलीपसिंग सोडी यांनी मारहान केली आणि त्याची चीत्रफीत स्वतः तयार करुन व्हायरल केली. दहशत निर्माण करावयाच्या उदेशाने ती चित्रफीत व्हायरल केली. त्यामुळे आज सकाळी कर्मचा-यांनी काम बंद आंदोलन गेटवर चालू केले आहे. पाणी पुरवठयाचे कर्मचारी हे रात्रदिवस काम करीत आहेत. नदी काठी एनआरएपीचे कामासाठी संदीप पाटील यांना श्री दिलीपसिंग सोडी यांनी बोलावून घेवून त्यांच्यावर दुस-या आणखी व्यक्ती सोबत ठेवून हल्ला केला

आहे. या बाबीचा आम्ही सर्वजन जाहीर निषेध करतो. आणि महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम 13 (ब) मधील तरतुदीनुसार श्रीमती गुरप्रितकौर सोडी यांचे पती श्री दिलीपसिंग सोडी यांच्यावर कार्यवाही करण्यात यावी अशी आम्ही मागणी करतो. त्यांना अपात्र करण्याची तरतुद आहे. श्री दिलीपसिंग सोडी हे नगरसेविका श्रीमती गुरुदीपकौर सोडी यांचे पती असल्याने त्यांचे नगरसेवक पद रद्द करण्याचा व त्यांना अपात्र करण्याचा प्रस्ताव या ठीकाणी ठेवतो या प्रस्तावास मान्यता देण्यात यावी अशी विनंती करतो.

**किशोर स्वामी** श्री विरेंद्रसिंघ गाडीवाले सभागृहनेता यांनी जो प्रस्ताव मांडला आहे त्यास माझे अनुमोदन आहे

**आनंद चव्हान** माझे ही अनुमोदन आहे.

**गुरप्रितकौर सोडी** संदीप पाटील हे त्यांच्या अधिका-यांचे काम ऐकत नाही. तो अधिका-याची बदनामी करतो. त्यांना आम्ही सांगीतले की, रात्रीच्या वेळी पाणी सोडणे बंद करा परंतू ते ऐकत नाही. आम्हाला रात्रभर पाणी भरावे लागत आहे. आमचा झोपण्याची वेळ असते त्याकरीता पाणी सोडण्याची वेळ बदलण्यात यावी परंतू ते ऐकत नाहीत. चिखलवाडी व जुना मोंढा भागातील रस्त्याच्या सेन्टरवरील ड्रेनेजचे तीन कव्हर टाकण्यासाठी सांगीतले तरी ते चेबंर कव्हर टाकत नाहीत, यामुळे अपघात होण्याची शक्यता आहे परंतू ते काम करीत नाहीत. गोवर्धन घाटावर सकाळी पाच वाजेपर्यत काम सुरु राहते त्यांना सांगीतले की, रात्र काम करत राहु नये. माझ्या प्रभागातील लोकांनी त्यांना मारहान केली आहे माझ्या पतीने त्यांना मारहाण केलेली नाही. लोकांची जी तक्रार आहे ती आम्हाला येवून सांगत आहेत. त्यांची कामे आम्हाला नगरसेवक या नात्यांने करणे आवश्यक आहे.

**अब्दुल सत्तार** अधिकारी काम करत नाहीत म्हणुन त्यांना मारहान करण्याचा अधिकार कोणी दिला हे सांगावे. आपली सत्ता आहे आपल्या पक्षाचे सीएम आहेत अधिकारी आपले ऐकत नाहीत म्हणजे काय हे सांगावे. अधिका-याची आपण तक्रार करावयास पाहीजे. आयुक्त, उप आयुक्त, कार्यकारी अभियंता यांचेकडे आपण तक्रार का केली नाही. त्यांना घाटावर घेवून जावून मारहान केली घाटावर काय होते हे सांगावे. श्री सोडी यांनी मारहान करण्याची चित्रफीत तयार करुन व्हायरल केली याचाच अर्थ आपण दहशत पसरवीत आहात हे सिध्द होते. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदीनुसार त्यांच्यावर कडक कार्यवाही करण्यात यावी. श्री सोडी व त्यांचे सोबतचे साथीदार यांना तात्काळ अटक करण्यात यावी. अपात्र करण्यासाठी न्यायालयाकडे हा ठराव पाठविण्यात यावा. व शासनासही प्रस्ताव सादर करावा. जोपर्यत आरोपीना अटक होत नाही तोपर्यत आमचा कर्मचा-याच्या काम बंद आंदोलनास पाठींबा जाहीर करतो. अटक होत नाही तोपर्यत सभागृह तहकुब करावे अशी महापौर यांना मी विनंती करतो.

**बालाजी कल्याणकर** अहमदनगर महानगरपालिकेचे उपमहापौर श्री छीदंम यांनी महाराष्ट्राचे दैवत, महाराष्ट्राचे कुलभुषण छत्रपती शिवाजी महाराज यांच्या बाबत अपशब्द उदगारले आहे. या घटनेचा मी शिवसेना पक्षाचा नगरसेवक या नात्यांने श्री छीदंम उपमहापौर यांचा मी जाहीर निषेध करतो.

**उमेश चव्हाण** एका अधिकारी काम करत नाही तर त्याची गचांडी धरुन काम करुन घेणे ही काही पध्दत नाही, आम्हीही नगरसेवक आहोत. प्रशासनात इतरही अधिकारी असतात त्यांना सांगीतले पाहीजे. बीजेपीचे पदाधिकारी श्री सोडी व त्यांचे सोबतचे साथीदार यांना तात्काळ अटक करण्यात यावी. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील नियम 13-ब नुसार श्रीमती गुरप्रिततकौर यांना अपात्र करण्यात यावे व न्यायालयाकडे हा ठराव पाठविण्यात यावा व शासनासही प्रस्ताव सादर करावा. जोपर्यत आरोपीना अटक होत नाही तोपर्यत आमचा कर्मचा-याच्या काम बंद आंदोलनास पाठींबा राहील. श्री दिलीपसिंग सोडी यांनी मारहान केली त्या घटनेचा मी जाहीर निषेध करतो.

**आनंद चव्हाण** अहमदनगर महानगरपालिकेचे उपमहापौर श्री छीदंम यांनी महाराष्ट्राचे दैवत, महाराष्ट्राचे कुलभुषण छत्रपती शिवाजी महाराज यांच्या बाबत अपशब्द उदगारले आहे. या घटनेचा मी काँग्रेस पक्षाचा नगरसेवक या नात्यांने श्री छीदंम उपमहापौर यांचा मी जाहीर निषेध करतो. दुसरी घटना म्हणजे संदीप पाटील यांना श्रीमती सोडी मॅडमचे पती व बीजेपीचे पदाधीकारी श्री दिलीपसींघ सोडी यांनी मारहान केली त्याही घटनेचा मी जाहीर निषेध करतो त्यांना कायदा हातात घेण्याचा अधिकार कोणी दिला आहे. नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

**बापुराव गजभारे** अख्या महाराष्ट्र भर छत्रपती शिवाजी महाराजाचे नांव घेवून ज्या बीजेपी पक्षाने मते मागुण निवडून आले त्या बीजेपी पक्षाचे अहमदनगर महानगरपालिकेचे उपमहापौर श्री छीदंम यांनी महाराष्ट्राचे कुलभुषण छत्रपती शिवाजी महाराज यांच्या बाबत अपशब्द उदगारले आहे. या घटनेचा मी पीपल्स

रिपब्लीकन पार्टी पक्षाचा नगरसेवक या नात्यांने माझा मित्र पक्ष कॉंग्रेस यांचे वतीने श्री छीदंम उपमहापौर यांचा मी जाहीर निषेध करतो. संदीप पाटील यांच्यावरही हल्ला केला आहे त्याचा मी जाहीर निषेध करतो.

**स. शेर अली** बीजेपी पक्षाचे अहमदनगर महानगरपालिकेचे उपमहापौर श्री छीदंम यांनी महाराष्ट्राचे कुलभुषण छत्रपती शिवाजी महाराज यांच्या बाबत अपशब्द उदगारले आहे. या घटनेचा मी निषेध करतो व दुसरी घटना म्हणजे संदीप पाटील यांना श्रीमती सोडी मॅडमचे पती व बीजेपीचे पदाधिकारी श्री दिलीपसींघ सोडी यांनी मारहान केली त्याही घटनेचा मी जाहीर निषेध करतो त्यांना कायदा हातात घेतला आहे. कोणताही सदस्य हा कर्मचा-यांना मारहाण करीत असेल तर त्याच्यावर कडक कार्यवाही करण्यात यावी.

**अ. शमीम अब्दुल्ला साब** बीजेपी पक्षाचे अहमदनगर महानगरपालिकेचे उपमहापौर श्री छीदंम यांनी महाराष्ट्राचे कुलभुषण छत्रपती शिवाजी महाराज यांच्या बाबत अपशब्द उदगारले आहे. या घटनेचा मी निषेध करतो व दुसरी घटना म्हणजे संदीप पाटील यांना श्रीमती सोडी मॅडमचे पती व बीजेपीचे पदाधिकारी श्री दिलीपसींघ सोडी यांनी मारहान केली त्याही घटनेचा मी जाहीर निषेध करतो त्यांना कायदा हातात घेतला आहे. पोलीस स्टेशनमध्ये मी स्वत:गेलो. त्या ठिकाणी एका तासापासुन आमचा अभियंता त्या पोलीस स्टेशन मध्ये बसुन होते त्यांच्या डोळयाला एवढी मोठी जखम झाली होती की, पोलीस स्टेशन मध्ये त्याची दखल घेत नव्हते. त्यांना मी सांगीतले हे आमच्या महानगरपालिकेचे अभियंता आहेत, त्यांची तक्रार नोंद करुन घ्यावी. परंतु पोलीस तक्रार नोंद करुन घेत नव्हते. मी डीवायएसपी यांना फोन केला त्यानंतर 12.00 वाजता त्यांना दवाखान्यात नेण्यात आले. त्या इंजीनीयरच्या डोळयातुन रक्त प्रवाह चालू होता. तीन चेंबर कव्हरचे काम होते तर कार्यकारी अभियंता, मा. आयुक्त अथवा मा. महापौर यांना लेखी पत्र देणे आवश्यक होते. पण तीन-चार लोक मीळुन मारहाण करीत असतील तर हे योग्य नाही. ज्या ठीकाणी मारहाण झाली त्या ठीकाणच्या काही सरदारजी यांनी संबधीतास पोलीस स्टेशन पर्यत आणले व आमच्या कर्मचा-यांची मदत केली त्याबाबत त्यांचे मी धन्यवाद मानतो. यापुर्वीही त्यांनी अशा घटना ब-याच घडल्या आहेत. ते दबाव टाकुन काम करुन घेत आहेत. या मीटींगची प्रोसिडींग तयार करुन कोर्टात पाठविण्यात यावी. इतरही लोकांना अटक करण्यात यावी.

**सभागृहनेता** कर्मचा-यारी काम करीत नाही म्हणुन त्यांनी काय लेखी तक्रार दीली होती काय? हे काम करीत नसतील तर त्यानंतर उप अभियंता, कार्यकारी अभियंता उप आयुक्त यांचे कडे गेले होत काय असे काही न करता मारहाण करणे चुकीचे आहे. शासन यांचे आहे कर्मचारी ऐकत नाही म्हणजे काय परंतू यांना केवळ दहशत पसरावयाची आहे. कर्मचारी यांनी खाली अंदोलन सुरु केले आहे. या आंदोलनास आमचा पाठींबा आहे. मी महापौरांना विनंती करतो की, कर्मचारी खाली आंदोलन करीत आहेत त्यांना पाठींबा दर्शवावा तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदीनुसार संबधीतावर कार्यवाही करण्यात यावी, अशी विनंती मी मा. आयुक्त महोदयांना करतो, संबधीतास अपात्र करण्याची कार्यवाही करावी, तोपर्यत सभा ही तहकुब करण्यात यावी.

**उप महापौर** बीजेपी पक्षाचे अहमदनगर महानगरपालिकेचे उपमहापौर श्री श्रीपाद छीदंम यांनी महाराष्ट्राचे कुलभुषण छत्रपती शिवाजी महाराज यांच्या बाबत अपशब्द उदगारले आहे. या घटनेचा मी निषेध करतो व दुसरी घटना म्हणजे संदीप पाटील यांची आहे. श्रीमती सोडी मॅडमचे पती व बीजेपीचे पदाधिकारी श्री दिलीपसींघ सोडी यांनी संदीप पाटील इंजिनियर यांना मारहान केली त्याही घटनेचा मी जाहीर निषेध करतो. कोणत्या वार्डात कामे करावयाचे शिल्लक नाही हे सांगावे, प्रत्येक प्रभागात कामे करावयाचे आहेत, कनिष्ठ अभियंता काम करीत नाही तर त्यांच्या वरीष्ठाकडे तक्रार करावी आपणास सभागृह आहे यात तो विषय घ्यावा, त्या कामाची पुर्तता करुन घ्यावी. परंतु मारहाण करणे चुकीचे आहे. बीजेपीचे पदाधिकारी श्री दिलीपसिंह सोडी यांच्यावर तात्काळ कारवाई करावी. शासनाकडे त्यांचा प्रस्ताव पाठवावा, अशी मा. आयुक्तांनी मी विनंती करतो.

**महापौर** बीजेपी पक्षाचे अहमदनगर महानगरपालिकेचे उपमहापौर श्री श्रीपाद छीदंम यांनी महाराष्ट्राचे कुलभुषण छत्रपती शिवाजी महाराज यांच्या बाबत अपशब्द उदगारले आहे. या घटनेचा मी निषेध करण्याचा ठरावास मान्यता देण्यात येते.

**ठराव क्रं.89** **ठराव**

अहमदनगर महनगरपालिकेचे श्री श्रीपाद छिंदम, उपमहापौर यांनी छात्रपती शिवाजी महाराजांचे अपमान केल्या बद्दल त्यांचे निषेध हि मनपा सर्वसाधारण सभा सर्वानुमते करते.

**महापौर** श्री संदीप पाटील इंजिनियर यांना श्रीमती सोडी मॅडमचे पती व बीजेपीचे पदाधिकारी श्री दिलीपसींघ सोडी यांनी मारहान केली त्या घटनेचा मी जाहीर निषेध करण्यात येते.

सर्व सदस्यांचा भावना लक्षात घेता नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेतील श्री संदिप पाटील, पाणी पुरवठा अभियंता, हे दिनांक 16.02.2018 रोजी उदासीमठ शनिमंदिर भागात NRAP अंतर्गत अस्तित्वात मलवाहिनी दुरुस्तीच्या कर्तव्यावर उपस्थित असतांना श्रीमती सोडी गुरुप्रितकौर दिलीपसिंघ नगरसेविका यांचे पती श्री सोडी दिलीपसिंघ व सोबती 03 व्यक्तींनी शासकिय कामात अडथळा निर्माण करुन शिवीगाळ व जबर मारहाण करुन जिवे मारण्याची धमकी दिली. सदर प्रकरणी इतवारा पोलीस स्टेशन येथे श्री दिलीपसिंघ सोडी व सोबती 03 व्यक्ती विरुध्द रितसर भा.द.वि 353, 341, 332, 504, 506, व 34 कलमान्वये गुन्हा दाखल केला आहे. तसेच सदरील प्रकरणाची व्हीडीओ क्लीप श्री दिलीपसिंघ सोडी यांनी सोशल मिडीयावर अधिकारी व कर्मचारी यांच्यात दहशत निर्माण व्हावी या उद्देशाने व्हायरल केली आहे जो की, झालेल्या प्रकरणाचा सबळ पुरावा आहे. करिता उक्त नगरसेविका किंवा त्यांच्या कुटूंबीया कडून अशा प्रकारे कृत्य अत्यंत चुकीचे असुन यापुढे या महानगरपालिकेतील अधिकारी व कर्मचा-यांवर अशी घटना होवु नये म्हणुन दिनांक 16.02.2018 रोजी झालेल्या प्रकरणाची चौकशी करुन आयुक्तांनी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 मधील तरतुदीनुसार संबंधीतांची नगरसेविका पद रद्द करण्याबाबत पुढील वैधानिक कार्यवाही करावी करण्यास मान्यता देण्यात येते.

**ठराव क्रं.90** **ठराव**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेतील श्री संदिप पाटील, पाणी पुरवठा अभियंता, हे दिनांक 16.02.2018 रोजी उदासीमठ शनिमंदिर भागात NRAP अंतर्गत अस्तित्वात मलवाहिनी दुरुस्तीच्या कर्तव्यावर उपस्थित असतांना श्रीमती सोडी गुरुप्रितकौर दिलीपसिंघ नगरसेविका यांचे पती श्री सोडी दिलीपसिंघ व सोबती 03 व्यक्तींनी शासकिय कामात अडथळा निर्माण करुन शिवीगाळ व जबर मारहाण करुन जिवे मारण्याची धमकी दिली. सदर प्रकरणी इतवारा पोलीस स्टेशन येथे श्री दिलीपसिंघ सोडी व सोबती 03 व्यक्ती विरुध्द रितसर भा.द.वि 353, 341, 332, 504, 506, व 34 कलमान्वये गुन्हा दाखल केला आहे. तसेच सदरील प्रकरणाची व्हीडीओ क्लीप श्री दिलीपसिंघ सोडी यांनी सोशल मिडीयावर अधिकारी व कर्मचारी यांच्यात दहशत निर्माण व्हावी या उद्देशाने व्हायरल केली आहे जो की, झालेल्या प्रकरणाचा सबळ पुरावा आहे.

करिता उक्त नगरसेविका किंवा त्यांच्या कुटूंबीया कडून अशा प्रकारे कृत्य अत्यंत चुकीचे असुन यापुढे या महानगरपालिकेतील अधिकारी व कर्मचा-यांवर अशी घटना होवु नये म्हणुन दिनांक 16.02.2018 रोजी झालेल्या प्रकरणाची चौकशी करुन आयुक्तांनी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 मधील तरतुदीनुसार संबंधीतांची नगरसेविका पद रद्द करण्याबाबत पुढील वैधानिक कार्यवाही करावी असे ही मनपा सर्वसाधारण सभा सर्वानुमते मान्यता देते.

**महापौर** स. सदस्यांच्या विनंतीनुसार आजची सभा सर्वानुमते तहकुब करण्यात येते.

शेवटी राष्ट्रगित म्हणण्यात येईल.

शेवटी राष्ट्रगित म्हणण्यात आले.

**स्वाक्षरीत/-**
**नगरसचिव**
**नावाशमनपा नांदेड**

**स्वाक्षरीत/-**
**महापौर**
**नावाशमनपा नांदेड**